जलसंपदा विभागातील सर्व मुख्य अभियंता आणि अधीक्षक अभियंता यांची एकत्रित "वरिष्ठ अभियंता परिषद" (Senior Engineers Council) कायम स्वरुपी स्थापन करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्र. पीएलएन-२०१९/प्र.क्र.११९/निवसं-२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २० सप्टेंबर, २०१९

प्रस्तावना:

राज्यात सिंचनाच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टिकोनातून लवादानुसार राज्याच्या वाटयास आलेल्या पाण्याचा विनियोग करण्यासाठी जलसंपदा विभागात अनेक पाटबंधारे प्रकल्प हाती घेतले जातात. जलसंपदा विभाग धरणे, कालवे, उपसा सिंचन योजना, वितरणप्रणाली, सिंचन व्यवस्थापन, जलविद्युत प्रकल्प, लाभक्षेत्र विकास प्रणाली, पूरनियंत्रण व खारभूमी प्रकल्पांचे बांधकाम, परिरक्षण व दुरुस्ती या मध्ये अग्रेसर आहे.

स्थापत्य अभियांत्रिकी क्षेत्रामध्ये मागील काही वर्षात उपलब्ध झालेले नवनवीन बांधकाम तंत्रज्ञान व केद्रींय जल आयोगामार्फत प्रत्यक्षात केलेल्या नवीन तंत्रज्ञानावर आधारित संकल्पनेच्या पध्दती यांचा सखोल अभ्यास करुन शासनास अभ्यासपूर्ण शिफारस करण्याच्या अनुषंगाने जलसंपदा विभागातील राज्यस्तरावर राज्यातील कार्यरत सर्व मुख्य अभियंता आणि अधीक्षक अभियंता यांची "वरिष्ठ अभियंता परिषद" (Senior Engineers Council) कायमस्वरुपी स्थापन करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

जलसंपदा विभागातील कार्यरत मुख्य अभियंता आणि अधीक्षक यांची "वरिष्ठ अभियंता परिषद" (Senior Engineers Council) स्थापन करण्यात येत आहे. या परिषदेचे स्वरुप खालीलप्रमाणे राहील.

अ.क्र.	पदनाम	परिषदेतील पदनाम
१.	सचिव (लाक्षेवि)	परिषदेचे स्थायी अध्यक्ष
२.	सचिव (प्रकल्प समन्व्य)	परिषदेचे स्थायी सह अध्यक्ष
३.	सर्व कार्यरत मुख्य अभियंते	सदस्य
४.	सर्व कार्यरत अधीक्षक अभियंता (निमंत्रित)	सदस्य
५.	अधीक्षक अभियंता व उप सचिव (सिंव्य)	सदस्य
६.	अधीक्षक अभियंता व उप सचिव (निवसं)	सदस्य सचिव

२. सचिव (लाक्षेवि) काही अपरिहार्य कारणांमुळे अनुपस्थित राहिल्यास सचिव (प्रकल्प समन्वय) हे परिषदेचे अध्यक्षस्थान भूषवतील. दोन्ही सचिव हे काही अपरिहार्य कारणास्तव अनुपस्थित राहिल्यास, मुख्य अभियंता तथा सह सचिव (द. व प्र.), जलसंपदा विभाग हे परिषदेचे अध्यक्षस्थान भूषवतील. या परिषदेस आवश्यकतेनुसार कार्यरत अधीक्षक अभियंता यांना निमंत्रित करण्यात येईल.

३. सर्व कार्यरत मुख्य अभियंता यांची दर सहा महिन्यामध्ये दोन दिवस आळीपाळीने प्रत्येक पाटबंधारे महामंडळ मुख्यालयी बैठक होईल. या बैठकीत कार्यक्रमपत्रिकेनुसार जलसंपदा विभागाशी संबंधीत खालील विषयांबाबत सखोल विचारविनिमय करून, अभ्यासपूर्ण शिफारस परिषदेकडून शासनास करण्यात येईल.

१) सिंचन/ महामंडळ/ मजनिप्राविषयक कायदा/ नियमात परिस्थितीनुरून आवश्यकतेनुसार सुधारणा सुचविणे.

२) प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात सुक्ष्म सिंचन (Micro Irrigation), नलिका वितरण प्रणाली (PDN) ईत्यादी संबंधात निरंतर सुधारणा सुचविणे.

३) सिंचन कार्यक्षमता (More Crop Per Drop),सिंचनात शेतक-यांचा सहभाग वाढविण्याबाबत राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावरील उत्कृष्ट पध्दती अंगिकारणेबाबत.

४) मनुष्यबळ व्यवस्थापन/ क्षमता विकास याबाबत सुधारणा सुचविणे.

५) जलविज्ञान/ धरण सुरक्षितता/ संकल्पन/ संशोधन/ प्रशिक्षण संस्थांची व्याप्ती/ गुणात्मक सुधारणा सुचविणे.

६) जलविद्युत प्रकल्प विकसन व नुतनीकरणबाबत धोरण सुचविणे.

७) प्रचलित कार्यपध्दतीत पारदर्शकता व गतिमानता आणण्यासाठी सुधारणा सुचविणे.

८) नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून गती व कार्यक्षमता वाढविण्याबाबत शिफारशी करणे.

९) राष्ट्रीय/ आंतरराष्ट्रीय नामांकित संस्थांकडून (IIT/ NIT इ.) धरण/ कालवे/ जलविद्यत प्रकल्प इ. कामांमध्ये संशोधनात्मक बाबी हाती घेणे तसेच त्यांच्या अहवालाच्या अनुषंगाने विनिर्देश तयार करणे.

१०) नवीन तंत्रज्ञान/ नवीन साहित्य इ. बाबी लक्षात घेऊन सुधारित दरसूची तयार करून त्यास सर्व सहमती निर्माण करणे.

११) जलसंपदा विभागातील विविध विनिर्देशांमध्ये एकसूत्रता व किमान आवश्यक बाबींसाठी समानता आणण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

१२) प्रशासकीय व लेखाविषयक सुधारणा सुचविणे.

१३) प्रकल्पावरील खर्च मर्यादित करणे,प्रकल्पाचे काम गुणवत्तापूर्वक करणे,प्रकल्पाचा लाभ शेवटच्या शेतक-यांपर्यंत पोहोचविणे तसेच शासनाची प्रतिमा उंचविण्यासाठी विविध उपाययोजना सुचविणे.

४. या वरिष्ठ अभियंता परिषदेकडून शासनास प्राप्त झालेल्या शिफारशींचा सखोल अभ्यास करून आवश्यक ते प्रशासकीय, लेखाविषयक व तांत्रिक बाबींच्या निर्णयासंदर्भातील परिपत्रके/ सूचना/ निर्देश शासनस्तरावरून निर्गमित करण्याची कार्यवाही केली जाईल.

५. या शासन निर्णयाच्या दिनांकापासून ही परिषद अस्तित्वात येऊन कार्यरत होईल.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१९०९२०२२३२२४३०२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjay Madhukar Belsare

Digitally signed by Sanjay Madhukar Belsare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c8a87b959da59cf8368ea43eaa053e9d998e5a75fcbc096db9f951769cd1cef2, serialNumber=b619ff7825128b0ac0c1d94202f9f411ece90f19d72ab83faf5a9ddbdfc515de, cn=Sanjay Madhukar Belsare
Date: 2019.09.20 22:21:06 +05'30'

(डॉ. संजय बेलसरे)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे अपर मुख्य सचिव.
३. सर्व मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
४. मा. विरोधी पक्ष नेता विधानपरिषद/विधानसभा, विधानभवन, मुंबई यांचे खाजगी सचिव.
५. मा. मुख्य सचिव यांचे स्विय सहायक, मंत्रालय, मुंबई यांचे स्विय सहायक.
६. सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई यांचे स्विय सहायक.
७. महालेखाकार कार्यालय, मुंबई / नागपूर
८. सर्व कार्यकारी संचालक, पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर/औरंगाबाद/पुणे/जळगाव/ठाणे.
९. संचालक, (लेखा व कोषागारे), मुंबई .
१०. संचालक (सुधारणा), संचालनालय, लेखा व कोषागारे , नवीन प्रशासकीय भवन, ५ वा मजला , मुंबई .
११.सर्व मुख्य अभियंता, पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर/औरंगाबाद/पुणे/जळगाव/ठाणे.
१२.सर्व अधिक्षक अभियंता, पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर/औरंगाबाद/पुणे/जळगाव/ठाणे.
१३.सर्व कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर/औरंगाबाद/पुणे/जळगाव/ठाणे.
१४.सर्व उपविभागीय अभियंता, पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर/औरंगाबाद/पुणे/जळगाव/ठाणे.
१५.निवसं-२ कार्यासन संग्रहार्थ.